**CNR No.MHLA090019872022**

# निशाणी ५ खालील आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज आदेश ३९ नियम १ व २ दिवाणी प्रक्रिया संहिता प्रमाणे तात्पुरता मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. वादीच्या प्रस्तुत अर्जातील थोडक्यात कथन खालीलप्रमाणे–

वादी व प्रतिवादी एकमेकांचे शेतशेजारी असून एकाच गावातील रहिवाशी आहेत. वादी व प्रतिवादी यांचे कसलेही नातेसंबंध नाही. केवळ शेतशेजारी व एकाच गावातील असल्यामुळे ओळख आहे. वादीचे वडील नामे गुणवंत रावसाहेब बिरादार दि.०५/१०/२०२० रोजी मयत झाले असून त्यांच्या पश्चात वादी हेच मयताचे कायदेशीर वारस आहेत. वादीच्या वडीलांचे नाव पुर्वी बाबुराव रावसाहेब जाधव असे होते. शासन राजपत्राअन्वये फेर क्र.५४९ प्रमाणे नावात दुरुस्ती करुन गुणवंतराव रावसाहेब बिरादार असे केलेले आहे. अर्जदाराचे वडील हयात असताना वादमिळकतीचे उपभोग घेत होते. त्यांच्या मृत्युनंतर वारसा फेर क्र.६०५ प्रमाणे सदर जमीनीचा उपभोग वादी घेत आहेत.

३. वादी यांनी पुढे असे कथन केले आहे की, वादी हे मौ.एकुर्का रोड येथील जमीन भु.क्र.४ मधील एकुण क्षेत्र ०हे. २०आर जमीनीचे मालक व कब्जेदार असून सदर जमीनवर वादी हेच उपभोग घेत आहेत. सदर जमीनीमध्ये वादी मालक व कब्जेदार म्हणून उपभोग घेत असून तीस वादग्रस्त जमीन म्हणून संबोधण्यात येते.

४. वादी यांनी पुढे असे कथन केले आहे की, वादमिळकतीवर वादीचे वडील हयात असताना उपभोग घेत होते. वादीच्या वडीलांच्या मृत्यूनंतर त्यांचे वारस म्हणून वादी हेच उपभोग घेत आहेत. प्रतिवादीचा वादजमीनीशी कसलाही संबंध नाही केवळ प्रतिवादी ही स्त्री असल्याने कायद्याचा धाक दाखवून धमकी देत आहे व वाद करुन वादीची जमीन बळकवण्याचा प्रयत्न प्रतिवादी करीत आहे. वादग्रस्त मिळकती मधील प्रतिवादी ही वादीच्या पुर्व दक्षिण बाजूची शेजारी असल्याने सतत वादींना कुरापत काढून धमक्या देऊन वाद करण्याचा प्रयत्न करीत आहे. वादी हे वादग्रस्त मिळकती मध्ये दि.०५/०६/२०२२ रोजी शेतीमध्ये मशागतीचे काम करीत असताना प्रतिवादी ही वादीच्या वादग्रस्त जमीनीमध्ये येवून अर्वाच्च शिवीगाळ करुन जमीनमध्ये मशागत करावयाचे नाही, तुझ्या बापाची जमीन नाही, जमीनीमध्ये यानंतर आल्यास स्त्री कायद्याअंतर्गत कार्यवाही करण्याची व जेल मध्ये घालण्याची धमकी दिली.

५. वादी यांनी पुढे असे कथन केले आहे की, वादी हे गरीब कुटूंबातील असून सदर वादग्रस्त जमीनीमध्ये पेरणी करणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रतिवादी ही केंव्हाही वादीस सदर जमीनीमधून बेदखल करू शकते याचा भरोसा अर्जदारास नाही म्हणून वादीस सदर तुर्तातुर्त मनाई हुकूमाचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे. मे.न्यायालयात प्रतिवादीविरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकूमाचा अर्ज दाखल करीत आहे. वादीचा तुर्तातुर्त मनाई हुकूमाचा अर्ज सकृतदर्शनी आहे. वादी अर्जासोबत ७/१२ उतारा, फेरफार नक्कल दाखल करीत आहे. न्यायाचा समतोल वादीच्या हक्कात आहे म्हणून तुर्तातुर्त मनाई हुकूम देण्याची विनंती केली आहे.

६. प्रतिवादीने प्रस्तुत अर्जास नि.क्र.१३ वर तिचे म्हणणे देवून अर्जातील नमुद सर्व कथन नाकारले आहे व पुढे असे अभिकथन केले आहे की, प्रतिवादी स्त्री असुन तिचे पती हे भोळ्या स्वभावाचे आहेत. गैरअर्जदार

ही मौ.एकुर्का रोड, ता.उदगीर येथील सर्वे नं.३ क्षेत्र ०हे. ७१आर ही जमीन गैरअर्जदारस कोर्ट डिक्री दि.दा.क्र.२३५/२०१४(नवा) ८१/२०११(जुना) अन्वये मिळाली असुन गैरअर्जदार ही सदरील जमीनीची मालक व कब्जेदार आहे. खरी परीस्थीती व वस्तुस्थिती अशी आहे की, वादी हा गैरअर्जदार यांच्या शेतीचा शेतशेजारी नाही. गैरअर्जदार याच्या शेतीच्या चतुःसिमा कोर्ट डिक्रीमध्ये अवलोकन केले असता वादी हा गैरअर्जदार यांच्या शेतीच्या कोणत्याही दिशेचा शेतशेजारी नाही हे दिसून येते.

७. प्रतिवादीने पुढे असे अभिकथन केले आहे की, मा.तालुका उप.अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय, उदगीर यांचे शासकीय कार्यालयातून सर्वे नं.३ व सर्वे नं.४ चे टोच नकाशावरुन सुध्दा प्रथमदर्शनी हे दिसुन येते की, सर्वे नं.३ व ४ हे वेगवेगळे असुन या दोन्ही सर्वे नंबर मधुन नांदेड बिदर रोड गेलेला आहे त्यामुळे अर्जदार यानी आर्जात लिहलेल्या चतुःसिमा खोट्या दर्शविल्या आहेत हे सिध्द होत आहे. अर्जदार यांनी सत्य परिस्थिती लपवून, खोट्या चतुःसिमा दर्शवून न्यायालयाची दिशाभुल करुन सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. त्यामुळे अर्जदार हा कोणत्याही विनंतीस/सहाय्यास पात्र नाही. गैरअर्जदार ही एक महिला शेतकरी आहे. तिचे पती हे शांत व भोळसर असल्यामुळे अर्जदार यांचा गैरअर्जदार यांच्या जमीनीवर डोळा आहे. त्यामुळे सदरील जमीन हडप करण्याच्या उद्येशाने व गैरअर्जदाराची शारीरिक, आर्थिक पिळवणून करुन त्रास देण्याच्या उद्येशाने सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. त्यामुळे सदरचा अर्ज र.रु.१०,०००/– दंड लावून खारीज करण्याची विनंती केली आहे.

८. वादी व प्रतिवादी यांच्या परस्पर विरोधी कथनावरुन खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित झाले आहे. त्यांचे निष्कर्ष मी खालीलप्रमाणे नोंदवित आहेः–

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादीने प्रथमदर्शनी केस सिध्द केली आहे काय ? | ..नकारार्थी |
| २ | वादीने न्यायाचा तौलीक तराजू त्याच्या बाजूने असल्याचे सिध्द केले आहे काय ? | ..नकारार्थी |
| ३ | वादीने तुर्तातुर्त मनाई नाकारल्यास त्याचे अपरिमित नुकसान होणार असल्याचे सिध्द केले आहे काय ? | ..नकारार्थी |
| ४ | काय आदेश ? | अर्ज नामंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ ते ३ करिता:–**

९. मुद्दा क्र. १ ते ३ एकमेकांशी संलग्न असल्याने पुनरावृत्ती टाळणेसाठी ते एकत्रितरित्या विचारात घेतले आहेत.

१०. सदरचा अर्ज हा तुर्तातुर्त ताकीदीचा असल्यामूळे प्रकरणाच्या गुणदोषावर विस्तृतपणे उहापेह करणे जरुरी नाही. तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज विचारात घेत असताना प्रथमदर्शनी केस कोणाच्या बाजूने आहे व अर्ज नामंजूर केलेस कोणाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होईल इतकी मर्यादीत बाब विचारात घेणे जरुरीचे असते.

११. वादी यांच्या युक्तीवादानुसार वादी हे दावा मिळकतीचे कब्जेवहीवाटीस असून दावामिळकत ही वादीच्या नावावर आहे असे

असताना प्रतिवादी हे दि.०५/०६/२०२२ रोजी वादी यांच्या दावामिळकतीवर येवून शिवीगाळ करुन स्त्री कायद्याअंतर्गत कार्यवाही करण्याची व जेल मध्ये घालण्याची धमकी दिली आहे. वादीतर्फे विधिज्ञ यांनी असा युक्तीवाद केला आहे की गाव तलाठी नमुना न.६ व ७/१२ उतारावरील वादी हे सध्या दावामिळकतीत कब्जेवहीवाटीत आहेत.

१२. याउलट प्रवितादीतर्फे विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला आहे की, वादी व प्रतिवादी यांची मिळकत वेगवेगळी असल्याने प्रतिवादी हे वादीच्या मिळकतीमध्ये हरकत करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. वादी व प्रतिवादी यांच्या मिळकतीमध्ये उदगीर ते निलंगा असा जाणारा रस्ता असल्याने प्रतिवादी यांनी वादी यांच्या मिळकतीमध्ये हरकत केली नाही म्हणुन वादी यांचा अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे.

१३. सर्वप्रथम येथे महत्वाची बाब अशी आहे की, वादी व प्रतिवादी यांच्या मिळकती वेगवेगळ्या आहेत. वादी यांनी सदर प्रकरणात त्यांची मालकी शाबित करण्याकरीता फेरीस्त नि.क्र.४/१ व ४/२ कडील दावामिळकतीचा गाव नमुना नं.६ चा फेरफार नोंदवही (फेरफार पत्रक) दाखल केले आहे. तसेच वादी यांनी फेरीस्त नि.क्र.४/३ कडे दावामिळकतीचे ७/१२ उतारे दाखल केले आहे. त्याच्या अवलोकनावरुन असे दिसून येते की, वादी हे दावामिळकतीमध्ये क्षेत्र ०हे. २०आर क्षेत्रामधील वहीवाट करीत आहे. तसेच, वादी यांनी दाव्यासोबत फेरीस्त नि.क्र.२०/१ कडील सर्वे नं.७ पोट हिस्सा क्र.४ चा नकाशा दाखल केला आहे. त्याच्या अवलोकनावरुन असे कोठेही दिसून येत नाही की, वादी यांची भु क्र.४ व प्रतिवादी यांची भु क्र.३ एकमेकांलगत आहे. जोपर्यंत वादी हे प्रतिवादी त्यांच्या मिळकतीच्या कोणत्या बाजूस आहे ही बाब शाबित करीत नाही तोपर्यंत प्रतिवादी यांनी वादी यांच्या दावामिळकतीमध्ये येवून शिवीगाळ करुन अडथळा करण्याचा प्रयत्न केल्याचा मजकूरावर अवलंबून

राहू शकत नाही. प्रतिवादी हे वादमिळकतीवर अडथळा केल्याबाबतचा कोणताही लेखी किंवा तोंडी पुरावा सादर केला नाही.

१४. तुर्तातुर्त ताकीदीच्या अर्जावर विचार करतेवेळेस प्रथमदर्शनी केस सर्वप्रथम कोणाच्या बाजूस आहे हे पाहणे गरजेचे आहे. जरी वादी हे दावामिळकतीच्या मालकी वहीवाटीत असल्याचे त्यांच्या दाव्यात कथन करीत आहेत तरी सर्वप्रथम वादी यांनी प्रतिवादी हे त्यांच्या मिळकतीच्या कोणत्या बाहूस आहे ही बाब प्रथमदर्शनी शाबित करणे जरुरीचे आहे. वरील प्रमाणे वादी यांनी त्यांची केस प्रथमदर्शनी सिध्द केले नसल्याने न्यायाचा तौलिक तराजू वादीच्या बाजूने नाही. म्हणुन वादी यांना तात्पुरता मनाई हुकूम नाही दिला तर त्यांचे कोणतेही नुकसान होणार नाही ही बाब वादीच्या अर्जावरुन स्पष्टपणे दिसून येते. त्यामुळे मुद्या क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी देवून मुद्या क्र.४ करीता खालील आदेश पारीत करीत आहेः–

## आदेश

वादीचा **नि.५** कडील अर्ज नामंजूर करणेत येतो.
(आदेश खुल्या न्यायालयात सही करुन घोषित केला)

Digitally signed by JYOTIMALA CHANDRASHEKHAR GUPTA
Date: 2022.08.06 11:20:21 +0530

उदगीर (श्रीमती जे.सी.गुप्ता)
दिनांक: ०५/०८/२०२२ सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)
उदगीर.